आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

५ एप्रिल २०२४ - शुक्रवार

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग सातव्यांदा रेपो दर साडे सहा टक्के ठेवला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. रेपो दरात कोणताही बदल केला नसल्यानं गृहकर्ज महाग होणार नाही. चलनफुगवटा दरातली स्थिरता आणि आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचं शक्तिकांत दास यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.  रिझर्व्ह बँकेनं २०२४- २५ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात टक्के तर किरकोळ महागाई दर साडे चार टक्के रहाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३मध्ये रेपो दर साडे सहा टक्के केला होता.

**<><><><>**

बँकेत रोख जमा करण्यासाठीच्या यंत्रांमधे युपीआयचा वापर करून पैसे जमा करण्यासाठी रिझर्व्ह बँक लवकरच परवानगी देणार आहे. या सुविधेमुळे ग्राहकांची सोय होईल आणि बँकामध्ये पैसे हाताळण्याची प्रकिया अधिक कार्यक्षम होईल असं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं पीपीआय वा ॅलेटमधून युपीआयद्वारे व्यवहार करण्यासाठी अन्य ॲप्स वापरण्याची परवानगी देण्याचाही प्रस्ताव दिला आहे.

**<><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होत आहे.

राज्यात बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी काल अखेर एकंदर ३५२ उमेदवारांनी ४७७ अर्ज दाखल केले.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात ५ न्याय आणि २५ गॅरंटी या शीर्षकाखाली युवकांना रोजगार, न मिळाल्यास वार्षिक १ लाख रुपये बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना वार्षिक १ लाख रुपये अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि पिकाला हमीभाव, मनरेगामार्फत किमान ४०० रुपये दर रोज मजुरी, सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी जाति आधारित जनगणना, संवैधानिक संस्थांचं जतन, इत्यादी मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे.

भाजपाचा जाहिरनामा आज प्रसिद्ध होणार आहे. केंद्रीयमंत्री आणि ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली नेमलेली समिती हा जाहीरनामा तयार करत आहे.

भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीनं काल नवी दिल्लीत आपला निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध केला.

मतदानात मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागासाठी वेगवेगळा  कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या भागातल्या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक  त्यांनी आज नवी दिल्लीत  घेतली. या बैठकीमध्ये राज्यातल्या  मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, पालिकांचे आयुक्त सहभागी झाले. मतदान करण्याचा अभिमान वाटावा अशा प्रकारे जागृती करण्याचं आवाहन कुमार यांनी केलं.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या प्रचाराने वेग घेतला आहे. सर्वच पक्षांचे बडे प्रचारक ठिकठिकाणी सभा घेत आहेत तसंच रोड शो करत आहेत.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारी ८ एप्रिल रोजी महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातल्या प्रचारासाठी येणार आहेत. चंद्रपूर- वणी- आर्णी लोकसभा मतदारसंघात भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी ते मोरवा इथं सभा  घेणार आहेत.

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी यंत्रणा सज्ज झाल्या आहेत.  नांदेड जिल्ह्यात गुन्हेगारांच्या वीस टोळ्यांमधील साठ जणांना हद्दपार तर चौदा जणांना तुरुंगात स्थानबद्ध

केलं आहे. तसंच बेकायदेशीरपणे पिस्तूल बाळगणाऱ्या दहा जणांना अटक करण्यात आली. जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्या ८२ जणांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबादचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

//<><><><><>//

<><><><><>